इंडो-पॅसिफिक लॉजिस्टिक्स नेटवर्कला चालना देण्यासाठी क्वाडचा टोकियोमध्ये टेबलटॉप सराव संपन्न

3 आणि 4 सप्टेंबर 2026 रोजी, क्वाड भागीदारांनी (ऑस्ट्रेलिया, भारत, जपान आणि अमेरिका) टोकियो (जपान) येथे टेबलटॉप सराव (TTX) आयोजित केला. या सरावाचा उद्देश क्वाड इंडो-पॅसिफिक लॉजिस्टिक्स नेटवर्क (IPLN) ला पुढे नेणे आणि त्याद्वारे संपूर्ण प्रदेशात नागरी प्रतिसाद प्रयत्न अधिक सक्षम करणे हा होता. जपानच्या संरक्षण मंत्रालयाने मे 2026 मध्ये क्वाड परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत सहमती दिल्याप्रमाणे TTX चे आयोजन केले.

2. एप्रिल 2025 मध्ये हवाई येथे झालेल्या पहिल्या IPLN TTX आणि डिसेंबर 2025 मध्ये गुआम येथे झालेल्या क्षेत्रीय प्रशिक्षण सरावाच्या (FTX) निष्कर्षांवर आधारित, हा टेबल-टॉप सराव नैसर्गिक आपत्तींना प्रतिसाद देण्याच्या परिस्थितींवर केंद्रित होता. या सरावाद्वारे क्वाड भागीदारांनी आपापल्या लॉजिस्टिक्स क्षमतांचा सर्वोत्तम वापर कसा करता येईल, तसेच चारही भागीदारांमधील परस्पर कार्यक्षमता बळकट करून समन्वय कसा अधिक सुलभ करता येईल, या बाबींची पडताळणी केली. TTX च्या माध्यमातून, क्वाड भागीदारांनी IPLN च्या प्रमाणित कार्यपद्धती (SOPs) विकसित करण्याच्या दिशेने लक्षणीय प्रगती केली आहे, ज्यामुळे IPLN च्या प्रभावी कार्यान्वयनासाठी एक संस्थात्मक चौकट उपलब्ध होईल.

3. क्वाड भागीदारांनी अलीकडील विनाशकारी पुरामुळे बाधित झालेल्या सर्वांप्रती तीव्र संवेदना व्यक्त केल्या आणि गरजेच्या वेळी प्रादेशिक भागीदारांना सहकार्य करण्याच्या आपल्या सामायिक कटिबद्धतेवर भर दिला. संकट आणि आपत्कालीन परिस्थितीत मानवतावादी व मदतकार्यांमध्ये सर्वोत्तम समन्वय कसा साधता येईल, यावरही त्यांनी चर्चा केली.

4. इंडो-पॅसिफिक लॉजिस्टिक्स नेटवर्क हा एक महत्वाकांक्षी उपक्रम आहे जो क्वाड भागीदारांना त्यांच्या सामायिक लॉजिस्टिक्स क्षमतांचा वापर करून इंडो-पॅसिफिक क्षेत्रातील मोठ्या नैसर्गिक आपत्तींच्या परिस्थितीत नागरिकांना जलद, प्रभावी आणि समन्वित प्रतिसाद देण्यास सक्षम करतो. या उपक्रमाद्वारे जीवन वाचवण्यास मदत होते, पुनर्प्राप्ती प्रयत्नांना गती मिळते आणि क्षेत्रीय भागीदारांना आवश्यक ते समर्थन मिळते. या TTX ने प्रादेशिक आव्हानांचा सामना करण्यासाठी व्यावहारिक सहकार्य बळकट करण्याच्या आणि मुक्त व खुल्या इंडो-पॅसिफिक क्षेत्राची सुनिश्चिती करण्याच्या क्वाडच्या दृढ कटिबद्धतेचा पुनरुच्चार केला. क्वाड भागीदार IPLN कार्यान्वित करण्यासाठी प्रयत्न करत राहतील. ज्यामध्ये टेबलटॉप आणि क्षेत्रीय प्रशिक्षण सराव, विश्वास निर्माण करणाऱ्या उपाययोजना आणि विषय तज्ज्ञांच्या देवाणघेवाणीचा समावेश असेल.

नवी दिल्ली

13 सप्टेंबर 2026